पुणे महानगरपालिका

*** स्थायी समिती ***

**कार्यपत्रिका क्रमांक ३३**

स्थायी समितीची साप्ताहिक सभा **गुरुवार दि. १५/११/२०१८** रोजी सकाळी ११:३० (साडे अकरा) वाजता **महात्मा जोतिबा फुले सभागृहात** (स्थायी समिती सभागृहात) भरेल.

सदर सभेत खालील विषयांचा विचार होईल.

**वृत्तांत कायम करणे.**

## मा.सभासदांचे प्रस्ताव

**विषय क्र. १५५६**

**मा.डॉ.सिध्दार्थ धेंडे, उपमहापौर यांचे दि. १/११/२०१८ चे पत्र.**

पुणे महानगरपालिकेच्या पथ विभागामार्फत पुणे शहरामध्ये प्रत्येक वर्षी नवे पथ करणे,जुने पथ दुरूस्ती करणे,डांबरीकरण करणे किंवा रस्ते कॉक्रीटीकरण करणे,फुटपाथ करणे या कामा करीता तरतुद केलेली असते. हे रस्ते झाल्यानंतर त्यांची देखभाल व दुरूस्ती ही त्या संबंधित ठेकेदारांकडे २(दोन)वर्षापर्यंत असते. सामान्य पुणेकर नागरिकांना या रस्त्यावरची माहिती उपलब्ध होणे गरजेची आहे.या करीता जो रस्ता अर्थसंकल्पामध्ये झालेला आहे त्या संबंधित ठेकेदाराने त्या ठिकाणी फलक लावून तो रस्ता ज्या लोकप्रतिनिधीच्या पाठपुरावामुळे झालेला आहे. तसेच पथ विभागाच्या अधिकाऱ्याचे नाव व सदर कामाची पुढील दोन वर्षापर्यंत देखभाल व दुरुस्ती करणे असे नमुद करणे.

सदर कामासाठी किती बजेट तरतुद होती व किती खर्चिक पडली ,वर्क ऑर्डर कधी दिली,त्यांने काम कधी पुर्ण केले याची तारीख फलकावर लिहावी. त्याखाली संबंधित ठेकेदाराने आपल्या एजन्सीचे नाव,पत्ता,दुरध्वीनी क्रमांक अशी संपूर्ण माहिती दिल्याने नागरिकांना संबंधित कामाची संपूर्ण माहिती उपलब्ध होऊ शकेल.

संबंधित सर्व माहिती ही पथ विभागाच्या अधिकाऱ्यानी महानगरपालिकेच्या वेब साईटवरती प्रसिध्द करावी.

## माहितीसाठी आलेले विषय

**विषय क्र. १५५७**

उप आयुक्त, परिमंडळ क्र. ५ यांच्या अखत्यारीतील माहे १ ते १५ सप्टेंबर २०१८ ची महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(ड) नुसार मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे विषयपत्रासोबत जोडल्याप्रमाणे कार्यादेश देण्यात आलेल्या कामाची माहिती निदर्शनास आणणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/प.क्र.५/६५७ दि.२/११/२०१८ चे पत्र.

**विषय क्र. १५५८**

उप आयुक्त, परिमंडळ क्र. ५ यांच्या अखत्यारीतील माहे १५ ते ३० सप्टेंबर २०१८ ची महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(ड) नुसार मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे विषयपत्रासोबत जोडल्याप्रमाणे कार्यादेश देण्यात आलेल्या कामाची माहिती निदर्शनास आणणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/प.क्र.५/६५८ दि.२/११/२०१८ चे पत्र.

**विषय क्र. १५५९**

उप आयुक्त, परिमंडळ क्र. ३ कार्यालयाचे नियंत्रणाखालील क्षेत्रिय कार्यालयांकडील महाराष्ट्र प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(ड) नुसार सन २०१८-१९ मधील मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे विषयपत्रासोबत जोडल्याप्रमाणे कार्यादेश देण्यात आलेल्या कामाची मासिक यादी (माहे सप्टेंबर २०१८) माहिती निदर्शनास आणणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/पक्र.-३/६५९ दि.२/११/२०१८ चे पत्र.

**विषय क्र. १५६०**

उप आयुक्त, (परिमंडळ विभाग क्र.१) पुणे महानगरपालिका यांच्या अंतर्गत असणाऱ्या कामांच्या दि.१६ ऑक्टोंबर २०१८ ते ३१ ऑक्टोंबर २०१८ ची महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(ड) नुसार मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे विषयपत्रासोबत जोडल्याप्रमाणे संविदा करार व तदनुषंगिक माहिती निदर्शनास आणणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/परिमंडळ-१/६६८ दि.५/११/२०१८ चे पत्र.

## सर्वात कमी रक्कमेची टेंडर्स

**विषय क्र. १५६१**

प्रभाग क्र. १ क (कळस धानोरी) मधील स.नं.१८ येथील ताब्यात आलेल्या ॲमिनिटी स्पेसवर अग्निशामक केंद्र उभारण्याचे उर्वरीत काम पुर्ण करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ५ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.मदन एन्टरप्रायझेस यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ८७,४५,१२०/- पेक्षा ॲटपार) असल्याने त्यांचेकडून र.रु.८७,४५,१२०/- उपलब्ध तरतुदीपर्यंत काम करून घेणेस व त्यांचेबरोबर करार करणेस अधिक जीएसटी र.रुपये१०,४९,४१४=४० पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रुपये ४०,९८८=६० पर्यंत अधिक मटेरियल टेस्टींग चार्जेस र.रुपये ४२,७३५/- अधिक अटीशर्तीतील विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व त्यांचेबरोबर करारनामा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/भवन/६५४ दि. १/११/२०१८ चे पत्र.

**विषय क्र. १५६२**

प्रभाग क्र. १ क (कळस धानोरी) मधील स.नं.१९/४ येथील ॲमिनिटी स्पेसवर माजी सैनिकांसाठी सांस्कृतिक हॉल बांधण्याचे उर्वरीत कामे पुर्ण करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ५ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.राजेंद्र ज्ञानोबा टिंगरे यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ७७,५५,०१७/- पेक्षा ॲटपार दराने) असल्याने त्यांचेकडून र.रुपये७७,५५,०१७/- उपलब्ध तरतुदीपर्यंत काम करून घेणेस व त्यांचेबरोबर करार करणेस अधिक जीएसटी र.रुपये९,३०,६०२=०६ पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रुपये ७०,५२८=६६ पर्यंत अधिक मटेरियल टेस्टिंग चार्जेस र.रुपये ५७,१२०/- पर्यंत अधिक अटीशर्तीतील विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व त्यांचेबरोबर करारनामा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/भवन/६५५ दि. १/११/२०१८ चे पत्र.

## संकिर्ण

**विषय क्र. १५६३**

राजीव गांधी प्राणीसंग्रहालय (कात्रज) येथील प्रवेश शुल्क व बॅटरी ऑपरेटेड वाहन शुल्क तिकीट दरात वाढ करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/उद्यान/६५२ दि. ३१/१०/२०१८ चे पत्र.

**राजेंद्र शेवाळे**
**उपनगरसचिव,**
**पुणे महानगरपालिका.**

**(टिप :- प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची कागदपत्रे (डॉकेटस) नगरसचिव यांच्या कार्यालयात वाचण्यासाठी ठेवली आहेत.)**